# ‘डॉ. व्ही. टी. पाटील यांची विविध क्षेत्रात कर्तृत्त्वाची मोहोर’

प्रतिनिधी
कोल्हापूर

बहुजन समाजाच्या उद्धारासाठी चंदनासारखे झिजलेले डॉ. व्ही. टी. पाटील हे माणसातले देव होते. राजर्षी शाहूंच्या मानवतावादी विचारांना त्यांनी ताराराणी आणि मौनी विद्यापीठाच्या स्थापनेतून कृतीने अधिष्ठान दिले. त्यांनी शिक्षण, सहकार, पर्यटन, राजकारण अशा विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्त्वाची आणि दातृत्वाची मोहोर उमटविली,असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी केले.

ताराराणी विद्यापीठातर्फे कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या एकविसाव्या स्मृतीदिनी डॉ. व्ही. टी. पाटील व्याख्यानमाले अंतर्गत आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कडगाव येथील राहुल फुटाणे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते राहुल फुटाणे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोबत व्ही. पी. निकम-पाटील, प्राजक्ता पाटील, एस. एन. पवार, डॉ. यशवंत पाटणे, डॉ. क्रांतीकुमार पाटील.**

डॉ. पाटणे म्हणाले, गुणवत्तेचा संबंध हा जन्माने प्राप्त होणाऱ्या उच्च जातीशी नसतो, तर प्राप्त होणाऱ्या शैक्षणिक संधीशी आणि संस्काराशी असतो. याच भूमिकेतून त्यांनी शिक्षणसंस्था आणि वसतीगृहाची उभारणी केली. ज्या माळरानावर माणसे फिरकत नव्हती आणि गवत उगवत नव्हते तिथे ज्ञानाची मंदिरे उभारून व्ही. टी. पाटील यांनी आपले देवत्व सिद्ध केले. आशावादी आणि मानवतावादी माणसे समाजात नवी स्फूर्ती देत असतात.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचेही भाषण झाले. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. पाहुण्यांची ओळख डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी करून दिली. सुत्रसंचालन पी. आर. मंडलिक यांनी केले. आभार प्रा. जयसिंग सावंत यांनी मानले. यावेळी डॉ. एस. एन. पवार, व्ही. पी. निकम-पाटील, प्राजक्ता पाटील आदी उपस्थित होते.

Scanned by CamScanner